# अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे-०५

---

दिनांक-३१/१२/२०१५

## <u>वसतिगृह निर्वाह भत्ता/ विद्या वेतन योजना (Hostel Maintenance)</u>

शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रथम वर्ष व थेट व्दितीय वर्षांत प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गामधील (OBC प्रवर्ग वगळून) जे विद्यार्थी **शिष्यवृत्तीधारक** आहेत व ज्यांना शासकीय व कॉलेजच्या वसतिगृहात प्रवेश मिळालेला आहे अशा विद्यार्थ्यांना वसतिगृह निर्वाह भत्ता/विद्या वेतन योजनेचा अर्ज ऑनलाईन भरुन दिनांक १२/०१/२०१६ पूर्वी लेखाविभागात सादर करावेत. अनुसुचित जमातीच्या (ST) विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज न भरता मॅन्युअली अर्ज भरावयाचा आहे. तसेच जे विद्यार्थी शासकीय किंवा कॉलेजच्या वसतिगृहामध्ये प्रवेश मिळण्यास पात्र आहेत परंतु त्यांची नावे **Waiting List** मध्ये आहे व त्यांना शासकीय किंवा कॉलेजच्या वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा वसतिगृहाबाहेर राहणा-या विद्यार्थ्यांना खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीनुसार निर्वाहभत्ता देण्यास शासन मंजूरी प्रदान करीत आहे.

१. विद्यार्थी भारत सरकार **शिष्यवृत्तीधारक** असावा

२. भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेस जी उत्पन्नाची मर्यादा आहे तीच मर्यादा या योजनेस लागू राहील.

३ सदरहू विद्यार्थी शासकीय किंवा कॉलेजच्या वसतिगृहात प्रवेश घेतलेला असावा.

४ सदरहू विद्यार्थ्याने शासकीय किंवा कॉलेजच्या वसतिगृहात प्रवेश मिळण्यासाठी अर्ज केला होता पण प्रवेश मिळालेला नाही, त्याबाबतचे प्रमाणपत्र शासकीय किंवा कॉलेजच्या वसतिगृहाच्या अधिका-यांमार्फत प्राप्त करुन घ्यावे लागेल.

५ जे विद्यार्थी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळण्यास पात्र आहेत परंतु त्या विद्यार्थ्यांना शासकीय किंवा कॉलेजच्या वसतिगृह व व्यावसायिक पाठयक्रमाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयातील वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही परंतु त्यांनी त्यांची राहण्याची सोय इतर ठिकाणी म्हणजे खाजगी वसतिगृहात किंवा खोली भाडयाने घेउन केलेली आहे, असे विद्यार्थी ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणाच्या घरमालकाचे प्रमाणपत्रासह करारपत्र (**आग्रिमेंट**)/शपथपत्र (**ॲफिडेव्हिट**) दाखल करणे आवश्यक आहे व दर महिना खोली भाडे भरत असल्याचे पवती अर्जासोबत जोडावे. जर एखादया विद्यार्थ्याला इतर शिष्यवृत्तीमधून वसतिगृह भत्ता मिळत असेल तर अशा विद्यार्थ्यांनी वरील वसतिगृह भत्त्यासाठी अर्ज करु नये. (उदा. राजर्षी शाहूमहाराज शिष्यवृत्ती )

**वसतिगृह निर्वाह भत्ता/ विद्या वेतन योजनेचा अर्ज ऑनलाईन www.mahaeschol.maharashtra.gov.in या वेबसाइटवर भरत असताना शिष्यवृत्तीचा युजरनेम व पासवर्ड वापरुन User Profile मध्ये जाऊन वसतीगृहामध्ये राहत आहात काय ? होय करुन वसतीगृहाचा प्रकार खाजगी करावा. व योजना निवडा मध्ये जाऊन विद्या वेतन योजना निवडणे. अर्ज भरताना काही अडचण असेल तर लेखा विभागात चौकशी करावी सर्वतोपरी सहकार्य केले जाईल. कृपया चुकीचा अर्ज भरु नये. स्थानिक विद्यार्थी किंवा स्वतःच्या घरी किंवा नातेवाईकांकडे राहणारा विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र असणार नाही.**

**<u>अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे</u> : १ जात पडताळणी प्रमाणपत्र. २. जातीचा दाखला. ३. वसतीगृह बोनाफाईड प्रमाणपत्र. ४. वसतीगृह फि भरल्याची रिसीट. ५.उत्पन्नाचा दाखला. ६.मागिल वर्षाचे गुणपत्रिका .७.दोन Undertaking Forms.**

स्थानपन्न संचालक,
अभियांत्रिकी महाविद्यालय ,
पुणे